CMYK

बीड । मंगळवार

०३.०६.२०२५

वर्षे : ५ अंक : ६३

किंमत : ३ रु. पाने : ४

दैनिक • www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१




# तलवाडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत मनोरंजनार्थ लायसन्सच्या नावाखाली राज रोज पत्त्यांचे क्लब सुरु

## •सपोनी मनोज निलंगेकर यांनी चार्ज घेताच वैधतेच्या नावाखाली अवैध धंद्यावाल्यांची सलामी



**शेख आतिख**

बीड जिल्ह्यात सरपंच संतोष आण्णा देशमुख यांची हत्या झाली आणि जिल्ह्यातील गुन्हेगारी समोर आली .अवैध धंदे करून अमाप माया जमवली त्यांनी सामान्य माणसाला गुरा - ढोरा सारखी वागणूक देत मारहाण केली त्याम ुळे याच्यावर अंकुश ठेवण्यासाठी पोलिस अधीक्षक म्हणून कुमावत यांची नेमणूक केली त्यांची नेमणूक होताच जिल्ह्यातील जवळपास सर्वच अवैध धंदे बंद झाले परंतु काही प्रमाणात जिल्ह्यात अनेक ठिकाणी बिनबोभाट मटका, पत्त्यांचे क्लब, अवैध वाहतूक, देशी विदेशी दारू विक्री सुरू असल्याने काय, बंद झाले आणि काय सुरू आहे हे कळायला मार्ग नसून तळवड्यात मनोरंजनार्थ आद्य लायसन्स च्या नावाखाली पत्त्यांचे क्लब सर्रास सुरू झाले असून एक जून रोजी तलवाडा पोलिस स्टेशनला सपोनी मनोज निलंगेकर यांनी चार्ज घेतला. निलगेकर रुजू झाले त्याच दिवशी छत्रपती शिवाजी महाराज चौकात एका नव्या पत्त्याच्या क्लब चे म नोरंजनाच्या नावाखाली सुरुवात झाली त्या मुळे हे अवैध धंदे कधी बंद होतील यात शंका निर्माण होत असून नव्याने रुजू झालेले निलंगेकर हे वैधतेच्या नावाखाली सुरु झालेले अवैध धंदे बंद करतील का आसा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. गेवराई तालुक्यातील तलवाडा या ठिकाणी सर्रास अवैध धंदे सुरू असून, गुटखा, मटका, देशी, विदेशी दारू, मावा आणि मनोरंजनार्थ लायसन्स च्या नावाखाली पत्त्यांचे क्लब राजरोस पणे सुरू आहेत,



जिल्ह्यात गुन्हेगारी च्या घटना दिवसेंदिवस घडत आहेत याला अवैध धंदे कारणीभूत आसल्याचे निष्कर्ष शासन आणि प्रशासनाच्या ध्यानस्थ आसल्याने जिल्हा पोलीस आधिक्षक नवनीत कॉवत साहेबांनी जिल्ह्याभरात अवैध धंदे बंद करण्याच्या सुचना सर्व पोलीस स्टेशनला दिल्या होत्या. पण पोलीस प्रशासनातील काही पदाधिकारी धंदे बंद असल्याचे फक्त दाखवत आहेत परंतु ते प्रत्यक्षात बंद नाहीत हे पोलिस अधीक्षक यांना माहीत नसेल त्यामुळे स्थानिक पोलीस आणि पोलिस उपविभागीय अधिकारी यांनी याकडे आर्थिक

▶▶ उर्वरित पान २ वर

## मतदारसंघातील रस्त्यांसह विविध विषयी आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली बैठक





**बीड । प्रतिनिधी**

बीड मतदारसंघातील रस्ते तसेच विविध विषयांच्या संदर्भात आ.संदीप क्षीरसागर यांनी आढावा बैठक घेतली. या बैठकीत नगर रोडवरील डिव्हायडर व रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण करणे, राजुरी ते खरवंडी रस्त्यावरील पुलाचे रखडलेले काम, लिंबागणेश-मांजरसुंबा रस्त्यावरील जाधव वस्तीजवळ साठत असलेले पाणी, बिंदुसरा नदीवरील पूल कम बंधार्याचे संथगतीने होत असलेले काम, बीड शहरातील बार्शी रोडवर असलेला राष्ट्रवादी भवन समोरील मोठा खड्डा दुरूस्त करणे तसेच नगरपरिषदेकडून शहरात सुरू असलेल्या स्वच्छता काम व पाणीपुरवठा या विविध विषयांचा आ.संदीप क्षीरसागर यांनी आढावा घेतला. मतदारसंघातील बीड शहर आणि ग्रामीण भागातील रस्ते, पूल आणि विविध त्यासंबंधित विविध विषय तसेच शहरातील पाणीपुरवठा आणि स्वच्छता यांच्या संदर्भात आ.संदीप क्षीरसागर यांनी सोमवारी (दि.२) रोजी बीड येथील शासकीय विश्राम गृह येथे ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड: तालुक्यातील कपिलधार येथील धबधबा पाहण्यासाठी पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसत. अनेक कप्पाल पाण्यामध्ये उतरत असल्याने पर्यटकानच्या जीवितास धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही.*










CMYK

# जनसामान्यांचा आधार विकासशील लोकनेतृत्व नगरसेवक शेख आमेर आण्णा



बीड शहरातील गोरगरीबांना अहोरात्र मदत करणारे सर्व सामान्यांच्या सुखदुःखात सतत सहभागी असणारे लोकप्रिय मा.नगरसेवक म्हणजे शेख आमेर आण्णा होय....

सर्व सामान्य कुटुंबात जन्म घेतल्याने ते दुखीतांचे अश्रू पुसण्यासाठी सतत तत्पर असतात. दवाखाना असो की नगरपरिषद, तहसीलचे काम ते अडल्या नडल्यांना सर्व सामान्यांना तात्काळ मदत करून आधार देतात. त्यांनी रात्री अपरात्री गंभीर रूग्णांना दवाखान्यात दाखल करून त्यांचे प्राण वाचविले असल्याने ते गोरगरीबांचे देवदुत मसीहाच आहेत. समाजसेवेत असताना लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी राजकारणात सहभागी होण्याचा निर्णय घेतला व ते आ. संदिप भैय्या क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली राजकारणात सहभागी झाले व बीड शहरातील वार्ड क्रमांक -८ मधून निवडून आले नगरसेवक झाल्यानंतर त्यांनी आपला जनसेवेचा वसा अखंड सुरू ठेवला. आपल्या भागातील रस्ते,नालीचे प्रश्न सोडवले, पंतप्रधान आवास योजनेचा गोरगरीब कुटंबाला लाभ मिळवून देण्यासाठी त्यांचा सिंहाचा वाटा आहे. गोरगरीब सर्वसामान्य कुटुंबाला मोफत रेशनची सुविधा मिळवून देण्यासाठी नवीन रेशनकार्ड उपलबध करून देऊन अनमोल आधार दिला आहे.

तसेच गंभीर रूग्णांना मोफत रक्त पिशवी देऊन त्यांचे प्राण वाचविले आहेत. कोरोना काळात त्यांनी कोरोनाग्रस्तांना उपचार मिळवून देत त्यांचे प्राण वाचविले आहेत तसेच लॉकडाऊन मुळे गोरगरीबांना उपासमारीचे दिवस आले होते त्यामुळे आमेर आण्णा यांनी गोरगरीबांना महिनाभर पुरेल एवढा किराणा देऊन त्यांना आधार दिला. पवित्र रमजान मध्ये शिरकुर्मासाठी लागणारे साहित्य किट देऊन त्यांनी गोरगरीब मुस्लिम कुटुंबाला आधार दिला. दिवाळीत हिंदू कुटुंबाला किराणा किट देऊन त्यांना अनमोल सहकार्य केले. त्यामुळे ते सामाजिक ऐक्य अबाधित राखणारे लोकनृत्य आहेत. सामाजिक सौहार्द राखण्यासाठी ते सदैव तत्पर असतात.

आ. संदिप भैय्या क्षीरसागर यांच्या माध्यमातून त्यांनी प्रभाग क्रमांक -८ चा विकास केलेला असून पुढील टर्म मध्ये शेख आमेर आण्णा आणखी विकास साध्य करणार आहेत.

त्यांचा बीड शहरामध्ये खुप मोठा मित्र परिवार असून ते सर्व मित्र परीवारास अडचणीमध्ये सहकार्य करीत असतात.

असे हे शांत ,संयमी सर्व सामान्यांचे लोकप्रिय लोक नेतृत्व नगरसेवक शेख आमेर यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

# पावसाळी पर्यटन करताना काळजी घ्या !



मार्च महिन्याच्या मध्यापासूनच सुरु झालेला तीव्र उन्हाळा कधी एकदा संपून वर्षाऋतू सुरु होतोय याची प्रतीक्षा सर्वांनाच होती. यापूर्वी कधीही न अनुभवलेला उकाडा यंदा अनेकांनी सहन केला. त्यामुळे पावसाळा लवकरात लवकर सुरु व्हावा अशी सर्वांचीच अगदी मनापासून इच्छा होती. इंद्रदेवानेही सर्वांच्याच इच्छेचा मान ठेवत प्रतिवर्षीच्या ठरलेल्या नियोजनात बदल केला आणि वर्षाऋतूला १३ दिवस आधीच महाराष्ट्रात पाठवले. शेतकरी, व्यावसायिक, फेरीवाले, मुंबईतील झोपडपट्यांत वसणारे नागरिक यांची पावसापूर्वी करावयाची सिद्धता तशीच राहिली असली तरी यंदाचा जीवघेणा उकाडा सहन केल्यानंतर मिळालेल्या पावसाच्या गारव्याने राज्यातील सामान्य माणूस मात्र सुखावला आहे. वर्षाऋतूच्या आगमनाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी तरुणवर्ग दरवर्षी पावसाच्या आरंभी पावसाळी सहलीचे आयोजन करत असतो. राज्यातील अशी काही पर्यटनस्थळे आहेत ज्या ठिकाणी पावसाळ्यात आनंद लुटण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक येतात. धबधबे, नद्या, तळी किंवा समुद्रकिनारे लाभलेली ही स्थळे पावसाळ्यात ओसंडून वाहू लागतात. ही ठिकाणे जशी पर्यटकांना मनमुराद आनंद देतात तशीच याठिकाणी योग्य ती काळजी न घेतल्यास ती पर्यटकांचा जीव घेण्यासही कारणीभूत ठरू ठरतात. अशा पावसाळी पर्यटनस्थळांच्या ठिकाणी दरवर्षी कुठेनाकुठे अपघात होऊन पर्यटक पाण्यात बुडाल्याच्या किंवा वाहून गेल्याच्या बातम्या वाचनात येतात. पाण्याच्या ठिकाणी उत्साहाच्या भरात पर्यटक स्वतःला झोकून देतात. बऱ्याचदा पाण्याच्या खोलीचा आणि वेगाचा अंदाज न आल्यामुळे अपघात घडतात. तर काही अतिउत्साही तरुण तरुणी सेल्फीच्या नादात अपघातांना बळी पडतात. मद्यपान करून पाण्यात उतरल्याने पट्टीचे पोहणारे सुद्धा पाण्याच्या वेगासमोर असमर्थ ठरतात. पाण्याच्या ठिकाणी जिथे पर्यटकांची ये जा असते अशा ठिकाणी जीवन रक्षकांची सुद्धा व्यवस्था असते; मात्र पावसाळ्यात येणाऱ्या पर्यटकांची संख्या पुष्कळ असल्यामुळे हे जीवन रक्षक त्या तुलनेत खूपच कमी पडतात. मौजमजेसाठी पाण्यात डुंबायला अवश्य जावे; मात्र ही मौज आपल्या जीवावर उलटणार नाही याची काळजी पर्यटकांनीच घेणे आवश्यक आहे. पाण्याच्या वेगाशी आणि खोलीशी उगाचच स्पर्धा करू नये, आपल्यासोबतच्या नातेवाईकांना आणि मित्रमैत्रिणींनाही याविषयी सक्त ताकीद द्यावी. लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी. मद्यपान करून पाण्यात मुळीच जाऊ नये. आपण सहलीसाठी जातो तेव्हा घरी आपली कुणीतरी वाट पाहत असते. आपण केलेली मौजमजा त्यांना ऐकून अनुभवायची असते. अशा आपल्या जिव्हाळ्याच्या व्यक्तीला धक्का बसणारी बातमी मिळणार नाही याची काळजी घेणे आपले कर्तव्यच नव्हे का ?

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

## पान १ वरून पुढे...

## तलवाडा पोलीस...

ठिकाणी सर्रास अवैध धंदे सुरू असून, गुटखा, मटका, देशी, विदेशी दारू, मावा आणि मनोरंजनार्थ लायसन्स च्या नावाखाली पत्त्यांचे क्लब राजरोस पणे सुरू आहेत, जिल्ह्यात गुन्हेगारी च्या घटना दिवसेंदिवस घडत आहेत याला अवैध धंदे कारणीभूत आसल्याचे निष्कर्ष शासन आणि प्रशासनाच्या ध्यानस्थ आसल्याने जिल्हा पोलीस आधिक्षक नवनीत कॉवत साहेबांनी जिल्ह्याभरात अवैध धंदे बंद करण्याच्या सुचना सर्व पोलीस स्टेशनला दिल्या होत्या. पण पोलीस प्रशासनातील काही पदाधिकारी धंदे बंद असल्याचे फक्त दाखवत आहेत परंतु ते प्रत्यक्षात बंद नाहीत हे पोलिस अधीक्षक यांना माहीत नसेल त्यामुळे स्थानिक पोलीस आणि पोलिस उपविभागीय अधिकारी यांनी याकडे आर्थिक कानाडोळा केला का ? अशीही चर्चा ऐकावयास मिळत आहे. तलवाडा येथे लायसन्स धारक जागेवर मनोरंजनाच्या नावाखाली लाखो रुपयाची उलाढाल होत आसल्याची चर्चा चोकात होतांना ऐकावयास मिळते. या ठिकाणी येणारा प्रत्येक जन दहा वीस हजार रुपये देवून रुपयांच्या ऐवजी कॉिवनचा वापर करत असल्याचे दिसुन येते. मनोरंजनार्थ लायसन्स धारक हेच चालक आम्ही शाहू असल्या सारखे आम्ही फक्त मनोरंजन करतो असे दाखवतात खरे परंतु याच लोकांची रोजची बँकेची हिस्ट्री,( स्टेटमेंट) तपासले तर लाखो रुपयाची उलाढाल होत असल्याचे आढळून येईल त्यामुळे आता पोलिस अधीक्षक, पोलीस उपविभागीय अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलिस अधिकारी याकडे लक्ष देवून हा गोरख धंदा बंद करतात का? का याला पाठबळ देतात हे पहावे लागेल. या खेळा मुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले असून लेकरांच्या तोंडातला घास हिरावला जात आहेत त्या मुळे हा लायसन्स च्या नावाखाली चालणारा जुगार पोलीस अधीक्षक यांनी बंद करावा अशी मागणी करण्यात येत असून, या बाबत तलवाडा येथील एका जबाबदार लोकप्रतिनिधी यांनी पोलिस अधीक्षक यांना तक्रार दाखल केली असून यावर अजून कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे समजते.

## स्व. आर. टी. ...

## पान १ वरून पुढे...

आठवणींना उजाळा देताना मुंडेसह देशमुख कुटुंबीय सुध्दा भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. जीजांचे अकाली निधन ही देशमुख कुटुंबाइतकीच मुंडे कुटुंबाची सुद्धा हानी असून आता तिहाने कधीही भरून निघणार नाही अशा शब्दात धनंजय मुंडे यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. यावेळी आरटीजीसांचे ज्येष्ठ बंधू एच. टी. देशमुख एम.टी देशमुख, जे. टी. देशमुख, पुत्र रोहित देशमुख, राहुल देशमुख, अभिजित देशमुख यांसह देशमुख कुटुंबीय तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, माणिकभाऊ फड, रामेश्वर मुंडे यांसह आदी उपस्थित होते.

## आ. प्रकाश दादा,...

असतांना आज सकाळी मृत्यू झाला. जखमींना माजलगाव येथील रूग्णालयात उपचारार्थ पाठविण्यात आले. मयतात पतीपत्नीचा समावेश आहे.हाअपघात एवढा भिषण होता की,आयशरने टोला जवळपास ५० ते ६० फुट अंतरापर्यंत फरफटत नेले.घटनास्थळी दिंद्रुड पोलीस तात्काळ दाखल झाले. दरम्यान अपघाताची माहिती कळताच सामजिक कार्यकर्ते मुज्जमील पटेल, राजु कुरेशी, सुलतान मंसुरी, जुबेर सिद्दीकी, इरफान मिर्झा यांनी घटनास्थळी जावुन मदतकार्य सुरू केले होते. यासंदर्भात समजलेली माहिती अशी की,माजलगाव तालुक्यातील भाटवडगाव येथील कांही लोक टो क्र.एम एच.२३ एन ०२७३ ने रविवारी अकरा ते साडे अकरा वाजेदरम्यान तेलगावकडुन माजलगावकडे जात असताना सदरील टो नित्रुड जवळील एका पेट्रोल पंपा समोर आला असता समोरून येणाऱ्या आयशर क्र.एम.एच.२३ एम.९२५५ ने टोला जबरदस्त धडक दिली.आयशरने धडक देताच टो जवळपास ५० ते६० फुट दुर अंतरापर्यंत फरफटत नेले.या भिषण अपघातात टोमधील तीन जण जागीच ठार झाले असुन, मयतात एका महिलेचा समावेश आहे.तर दोन गंभीर जखमी झाले असुन,सर्व जखमी गंभीर आहेत, त्यांना तेलगाव येथील रूग्ण वाहिकेने माजलगाव येथील रूग्णालयात उपचारार्थ पाठविण्यात आले.यात फारूक चॉद सय्यद,त्यांच्या पत्नी सय्यद शबाना फारूक व शेख नोहिद एजाज,फैजान हे चार जण ठार झाले. तर फरहा अन्वर पठाण (२४वर्षे रा

## पान १ वरून पुढे...

भाटवडगाव) यांचा आज सकाळी रूग्णालयात मृत्यू झाला. मयताच्या जवळ असलेल्या आधारकार्डवरून त्यांची ओळख झाली.अपघातातील इतर मयत व जखमींचे नावे उपलब्ध होऊ शकले नाहीत.आयशर चालक घटनास्थळावरून पसार झाला.अपघाताची माहिती मिळताच दिंद्रुड पोलीस ठाण्याचे सपोनि महादेव ढाकणे यांच्यासह पोलीस कर्मचारी महेश साळुंखे, खलील मोमीन, सचिन गायकवाड, कानदास बनसोडे, चामनर आदि तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

भरधाव ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार जागीच ठार- भरधाव वेगात असलेल्या ट्रकने दुचाकीला जोरात धडक दिल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वार जागीच ठार झाल्याची दुर्दैवी घटना तेलगाव माजलगाव रस्त्यावर टालेवाडी फाट्या नजीक घडली.तेलगाव माजलगाव रस्त्यावर ठिकठिकाणी रस्त्याला मोठमोठ्या चिरा पडल्या असुन,या चिरात दुचाकी अडकून अनेकांचा बळी गेला असुन,हा अपघात ही चिर चूकवताना झाल्याचे समजते.त्यामुळे या रस्त्याने आणखी एक बळी घेतल्याची चर्चा घटनास्थळी चालु होती.मयत हा तेलगाव येथील साखर कारखान्यात नोकरीस होता. येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यात नोकरी असलेले महारूद्र भिमराव लोंढे रा.खालापुरी ता.जि.बीड ह.मु.सुंदरनगर तेलगाव हे दुचाकी क्र.एम.एच.२३७४२४ने रविवार दि.१जुन रोजी दुपारी तेलगावकडुन माजलगावकडे जात असताना तेलगाव-माजलगाव रस्त्यावर टालेवाडी नजीक रोडला पडलेल्या चिरा चुकवताना समोरून भरधाव वेगात येत असलेल्या ट्रक क्र.एम.एच.४४७३७१ जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात महारूद्र लोंढे हे जागीच ठार झाले.अपघात झाल्यानंतर कांही वेळ या मार्गावर मोठी वाहतुक कोंडी झाली होती.अपघाताची माहिती मिळताच दिंद्रुड पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते.महारूद्र लोंढे हे गेल्या कांही वर्षापासुन तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यात डिस्लरी विभागात नोकरीस होते.ते कारखाना परिसरात वसाहतीत राहत होते.त्यांच्या अशा अपघाती निधनाबद्दल तेलगाव कारखाना परिसरासह खालापुरी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अपघातामुळे वाहतुक जाम रविवारी दुचाकी व ट्रकचा अपघात होऊन यात दुचाकीस्वार जागीच ठार झाला. हा अपघात ऐन रस्त्यावरच झाल्याने यामार्गावरून ये जा

## पान १ वरून पुढे...

करणाऱ्या वाहनांची मोठी अडचण होऊन,यामार्गावरील वाहतुक एकदीड तास ठप्प झाली होती.पोलीस व स्थानिक नागरिकांच्यामदतीने उशीरा वाहतुक सुरळीत झाली

## इथे लघवी ...

धाव घेतली. तोपर्यंत आरोपी चारचाकी गाड्यांमधून फरार झाले. पोलिसांनी जखमींना उपचारासाठी तातडीने रुग्णालयात दाखल केले. सध्या प्रकृती स्थिर आहे. घटनास्थळी पोलिसांना दोन जिवंत काडतूस व तीन गोळ्यांच्या पुंगळ्या सापडल्या आहेत. फिर्यादीवरून गु.र.नं.व कलम जामखेड पो. स्टे गु.र.नं.२९३/२०२५ भा.न्या सं २०२३ चे कलम १०९,११५(२), ३५२,३(५) सह आर्म अॅक्ट कलम ३,२५ प्रमाणे (पिस्टल मधुन फायर करुन जिवे मारण्याचा प्रयत्न) असे गून्हे दाखल करण्यात आला आहे. यानंतर अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. प्रशांत खैरे, पोलीस उपअधीक्षक उगले व पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी भेट दिली. सदर गुन्ह्यात वापरलेली कारच्या नंबरवरून पोलीसांनी शोध घेतला असून आरोपीच्या शोधार्थ तीन पथके रवाना केली आहेत तपास प्रगतीपथावर असल्याचे पोलिस निरीक्षक महेश पाटील यांनी सांगितले.

## मतदारसंघतील...

संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. या बैठकीत नुकत्याच नवीन झालेल्या नगर रोडवरील दुभाजकांवर आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वृक्षारोपण करणे, नवगण राजूरी येथे खरवंडी ते राजूरी रस्त्यावरील पूलाचे रखडलेले काम, लिंबागणेश ते मांजरसुंबा रस्त्यावर जाधववस्ती जवळ पाणी साठते यावर मार्ग काढणे, बीड शहरात बिंदुसरा नदीवर बंधारा कम पुलाचे काम संथगतीने सुरू आहे या कामाची गती वाढवणे, बार्शी रोडवरील राष्ट्रवादी भवन समोर पडलेला मोठा खड्डा दुरूस्त करणे तसेच बीड शहरात सुरू असलेल्या स्वच्छता काम आणि पाणी पुरवठ्याच्या कामांचा आ.संदीप क्षीरसागर यांनी आढावा घेऊन संबंधितांना योग्य त्या सूचना दिल्या. यावेळी माजी आ.सय्यद सलीम तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## पान ४ वरून पुढे...

## केंद्र व राज्य ....

करण्याचा केंद्रातील व राज्यातील सरकारचा अजिंठा आहे. अमेरिका ब्राझील अर्जेंटिना चीन या देशात सोयाबीनचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर होते. भारत देशातील सोयाबीन व भाजीपाला फळे इतर पिकांमध्ये सरकारच्या चुकीच्या आयात निर्यात करा मध्ये सवलत धोरणामुळे शेतीमालाचे भाव नसल्यामुळे शेतकरी आर्थिक दृष्ट्या चिंताजनक असून संपूर्ण शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यापुढे गंभीर आर्थिक संकट उभे राहत असल्यामुळे आत्महत्या वाढत आहेत . संपूर्ण देशातील जातनिहाय जनगणना करण्याकरिता आर्थिक शैक्षणिक सामाजिक राजकीय विविध निकष दर्शवून मूल्यमापन जातनिहाय आरक्षणासाठी करणे काळाची गरज आहे. परंतु आरएसएस च्या विचारधारेचे केंद्र व राज्यातील बीजेपी सरकार संपूर्ण देशातील आरक्षण रद्द करण्याची वाटचाल करीत आहे. त्यासाठी शेतकरी व ओबीसीच्या नेत्यांनी जनतेने केंद्र व राज्यातील सरकारच्या विरोधात प्रचंड मोठे जनआंदोलन उभे करण्याची तयारी करावी. शेतकऱ्याच्या दैनंदिन कुटुंबाचा खर्च भागवणे अडचणीचे झाले आहे. शेती मधील खते बी बियाणे कीटकनाशक औषधी ट्रॅक्टर खर्च खुरपणी फवारणी मळणी यंत्र मजुरी दैनंदिन खर्च वाढल्यामुळे व शेतीमालाचे भाव पाडले, त्यामुळे शेती परवडत नाही .उत्पादनातून खर्च निघणे शक्य नाही, शासनाचे बाजारपेठेवर नियंत्रण नाही. हमीभावापेक्षा कमी भावाने शेतकऱ्याचा शेतीमाल बाजारपेठेतून खरेदी केला जात आहे. शासनाकडून कोणतेही कारवाई नियमानुसार केली जात नाही. शासनाकडून आधारभूत किंमत शेतीमालाला मिळत नाही, बाजारपेठेवर नियंत्रण नाही. शेतकरी व ओबीसी समाजाचा कर्दनकाळ हा केंद्र व राज्य सरकार चे निष्क्रिय धोरण जबाबदार असल्याचा आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला.

## खरात आडगाव...

साठवण्यासाठी पाण्याच्या उंच टाकीचे प्रयोजन असते टाकी तर उभा

## पान ४ वरून पुढे...

राहिलीच नाही मग पाणी साठवणार कुठे? जिल्हा परिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे काय साठे लोटे तर नाही ना असा प्रश्न खरात आडगाव येथील जनतेला पडला असेल सदर गुत्तेदार आणि इंजिनियर यांचे बिलीन काढू नका अन्यथा खरात आडगाव येथील समस्त गावकरी बहुसंख्येने उपस्थित राहून जिल्हाधिकारी कार्यालय यांच्यासमोर आंदोलन करतील असा इशारा गावकऱ्यांनी बोलताना व्यक्त केला आहे

## शिवसैनिकांनो बॅनर...

अनिलदादांनी आपल्या शिवसैनिकांना एक भावनिक आणि विचारप्रवृत्त करणारे आवाहन केलं आहे. त्यांनी आपल्या अधिकृत फेसबुक पेजवरून शिवसैनिकांना सांगितलं आहे की, माझा वाढदिवस बॅनरमुक्त करा. हे बॅनर लावण्यासाठी लागणारा खर्च लाखोंच्या घरात जातो. त्याऐवजी हा पैसा गरजूंवर खर्च करा. अनिलदादांचे हे आवाहन केवळ एक विनंती नसून समाजासाठी आपली जबाबदारी ओळखणाऱ्या नेत्याचे भावनिक मनोगत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरु आहेत. अशा वेळी रस्त्यांवर भरपावसात भाजी विकणारे, कामावर जाताना मजूर, यांच्यासाठी रेनकोट किंवा छत्र्यांचे वाटप हा एक छोटा प्रयत्न असला, तरी त्यांना दिलासा देणारा हात ठरेल. माझा खरा वाढदिवस तेव्हाच साजरा होईल, जेव्हा गरिबांच्या चेहऱ्यावर तुमच्या मदतीमुळे हास्य उमटेल, असं सांगत अनिलदादांनी शिवसैनिकांना एक नवा विचार देत वाढदिवस गरजावंतांना मदतीचा हात द्या असे आवाहन केले आहे.

## 'जय श्रीराम....

न दिल्याने रक्कम रु. ५०,०००/-, त्रास, आणि खर्चापोटी रु. २५,०००/- असे एकून रु. १,५०,०००/- इतकी रक्कम भरपाई व दंड म्हणून ८% व्याजासह अदा करण्याचा आदेश दिला आहे. तक्रारदार जय हनुमान शेतकरी बचत गट कांबी यांच्या वतीने बीड येथील अॅड. सय्यद सांजेद, अॅड. तोफिक पठाण, व अॅड. पी. बी. वैरागळ यांनी काम पहिले.

## पान ४ वरून पुढे...

या निर्णयामुळे शेतकरी बचत गटाला मोठा दिलासा मिळाला असून, भविष्यात अशा प्रकारच्या फसवणुकीपासून इतर गटही सावध राहतील, असे गटाचे पदाधिकारी म्हणाले.

## बिंदूसरा मध्यम...

पालन करण्याचे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे. धरण परिसरात गर्दी करु नये: पाण्याचा प्रवाह अत्यंत वेगवान असून, अचानक पाण्याची पातळी वाढू शकते.त्यामुळे नागरिकांनी धरण परिसरात जाणे टाळावे. फोटो आणि सेल्फी टाळावेत: धरणाच्या काठावर उभे राहून फोटो किंवा सेल्फी घेणे अत्यंत धोकादायक आहे अशा कृतीमुळे अपघात होण्याची शक्यता वाढते. पालकांनी मुलांवर लक्ष ठेवावे: मुलांना धरण परिसरात जाण्यापासून रोखावे आणि त्यांच्या हलचालीवर लक्ष ठेवावे. प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे: स्थानिक प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. आपल्या आणि आपल्या कुंटूंबाच्या सुरक्षिततेसाठी वरील सूचनांचे पालन करणे अत्यांवश्यक आहे.धरण परिसरात कोणत्याही प्रकारचे बेजबाबदार वर्तन टाळावे.

## तरुण पिढीला...

करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक व स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आदित्य डेंटल कॉलेजने सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यविषयक जनजागृतीच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

**आरोग्य शिबिर व नाटिका सादरीकरण-** महाविद्यालयाच्या कम्युनिटी डेंटिस्ट्री विभागातर्फे आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात, स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. यामध्ये दंत

## पान ४ वरून पुढे...

तपासणीसह तंबाखू सोडण्यासाठी समुपदेशन सेवा दिली गेली. या सेवेसाठी कॉलेजकडे उपलब्ध असलेल्या मोबाइल डेंटल व्हॅन आणि पोर्टेबल डेंटल चेअर चा योग्य वापर करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सामाजिक नाटकांनी प्रेक्षकांना भावनिक दृष्ट्या हेलावून टाकले. तंबाखूचे परिणाम दाखवणाऱ्या या सादरीकरणानं उपस्थितांमध्ये विचारप्रवृत्तता निर्माण केली.

**सामाजिक बांधिलकीची जाणीव-** या सप्ताहाच्या आयोजानामागील प्रमुख हेतू म्हणजे तरुणांमध्ये तंबाखूविरोधी जनजागृती करणे आणि आरोग्यविषयक सकारात्मक वातावरण निर्माण करणे हा होता. यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग व त्यांचा समाजाशी असलेला संवाद हा खूपच प्रभावी ठरला.

**महाविद्यालयाने सामाजिक बांधिलकी जपली-** डॉ. आदिती सारडा यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाने सामाजिक बांधिलकी जपत आरोग्य विषयक जनजागृतीसाठी पुढाकार घेतला आहे. त्यांनी नमूद केले की, या उपक्रमांतून केवळ महाविद्यालया पुरतेच नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी आरोग्य दूत घडवण्याचे काम आपण करत आहोत. 'तंबाखू विरोधी सप्ताहा'च्या निमित्ताने आयोजित उपक्रमांनी केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे तर संपूर्ण बीड शहरात जनजागृतीचे वारे वाहू लागले आहेत. अशा कार्यक्रमांमुळे तरुणांमध्ये आरोग्याबाबतची जागरूकता वाढून त्यांना सशक्त, निर्णयक्षम आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार बनवण्यास मदत होते. डॉ. आदिती सारडा, प्राचार्य रॉबर्ट जस्टीन, उपप्राचार्य डॉ. हिमांशू श्रीवास्तव यांनी अभिनंदन केले.

## वारोळा (आश्रमशाळा....

गट विकास अधिकारी, बंजारा समाजाचे पि,टी ,चव्हाण, बाबुराव जाधव, शरद चव्हाण, जीवन राठोड, स्थानिक पदाधिकारी, ग्रामस्थ, प्रशासनातील अधिकारी तसेच मयतांच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. मंत्री राठोड यांच्या या दौऱ्यामुळे पीडित कुटुंबीयांना थोडासा दिलासा मिळाला असून, ग्रामस्थांनी त्यांच्या या तत्परतेचे स्वागत केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक ● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
मंगळवार, दि.०३ जून २०२५ पान ४

## केंद्र व राज्य सरकारने शेतकऱ्यांचे व ओबीसी जातीचे आर्थिक व सामाजिक राजकीय नुकसान केले : वसंत मुंडे



**परळी वै.। प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या केंद्र व राज्यातील सरकारने शेतकऱ्यांची भाव पाडून आर्थिक लूट केली व जनगणनेतून आरक्षणासाठी ओबीसीच्या जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न केला नाही असा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. शेतकऱ्यांचे खरीप व रब्बीचे शेती मालाचे उत्पन्न तयार झाले की परदेशातून सर्व प्रकारचा शेतीमाल ठराविक टक्केवारी देणाऱ्या व्यापाऱ्यामार्फत मागून घेऊन टॅक्समध्ये सवलत देऊन संपूर्ण शेतीमालाचे भाव पाडून शेतकऱ्याचे जीवन उध्वस्त ▶▶ उर्वरित पान २ वर

# खरात आडगाव जलजीवन चे काम निकृष्ट

## गुत्तेदार इंजिनियर च्या संगणमताने लाखोचा भ्रष्टाचार; गावकरी लवकरच करणार आंदोलन



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यात खरात आडगाव येथे गावाला पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळावे म्हणून जलजीवन अंतर्गत योजना राबवण्यात आली मात्र सदर योजनेत जल जीवन चे काम निकृष्ट करण्यात आले असून सदर योजनेच्या गावात कुठलाच फायदा होत नाही सदर योजनेमध्ये इंजिनियर आणि गुत्तेदार यांनी लाखो रुपयाचा भ्रष्टाचार केल्याने खरात आडगावकर आणखीनही पाण्यापासून वंचित आहेत गुत्तेदार आणि इंजिनियर यांच्यावर चौकशी करून तात्काळ कारवाई करा या मागणीसाठी गावकरी आंदोलन करणार असल्याचे कळत आहे

माजलगाव तालुक्यातील खरात आडगाव बहुजन समाजाचा गाव खरात आडगाव मधील लोकसंख्या एकूण जवळपास पाच हजाराच्या पुढे आहे गाव मोठा असल्याने गावाचा कायमस्वरूपी पाणी प्रश्न सोडवण्यासाठी बीड जिल्हा परिषदेने जल जीवन योजनेअंतर्गत गावाचा समावेश करून गावाला शुद्ध पाणी मिळावे म्हणून प्रयत्न केले मात्र जल जीवन योजनेचे इंजिनीयर आणि गुत्तेदार यांनी यामधूनही फक्त पैसे कमवीण्याचा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून काम केले निकृष्ट दर्जाचे पाईप वापरल्याने गावकऱ्यांना पाणी मिळणे अगोदरच पाईपलाईन शंभर जागेवर फुटली यामुळे खरात आडगाव येथील जनता पाण्यापासून वंचित राहिले जल जीवन योजना म्हणजे गुत्तेदार पोचण्याची योजना आहे का? असा प्रश्न गावकरी व्यक्त करत आहेत सदर गुटेदाराने आणि इंजिनीयरने निकृष्ट दर्जाची जलजीवन योजना राबवली यामध्ये पाणी ▶▶ उर्वरित पान २ वर

# शिवसैनिकांनो बॅनर नको, गरजवंतांना मदतीचा हात हीच माझ्यासाठी खरी शुभेच्छा: अनिलदादा जगताप

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांचा वाढदिवस येत्या बुधवार, ४ जून रोजी असून प्रत्येक वर्षी हा दिवस जिल्हाभरातील शिवसैनिकांसाठी एक उत्सव असतो. निष्ठावंत शिवसैनिकांकडून अनिलदादांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अनेक सामाजिक उपक्रम राबवले जातात, शहरभर बॅनर्स लावले जातात आणि हा दिवस जल्लोषात साजरा होतो. मात्र यंदा ▶▶ उर्वरित पान २ वर



**● सामाजिक उपक्रमांनी होणार अभिष्टचिंतन!**

**अनिलदादांच्या प्रेरणादायी आवाहनाला प्रतिसाद देत, जिल्हाभरातील शिवसैनिक अनिलदादांच्या वाढदिवसावर होणाऱ्या विविध खर्चातून सामाजिक उपक्रम राबवणार आहेत. अनेक ठिकाणी रेनकोट वाटप, अन्नदान, आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिर तसेच विविध समजपयोगी उपक्रमांचे आयोजन शिवसैनिक करणार आहेत.**



*बीड: ॲड. बापू जाधव यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतांना राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गट उद्योग आघाडी चे बीड जिल्हाध्यक्ष विजय दादा पोकळे, संभाजीनगर हायकोर्टाचे रर्वी चंद्रकांत ठोंबरे, ॲड. दाजी बसवर, सचिन गुजर आदी.*

## अवकाळी पावसाचा पहिला बळी; आर्थिक संकटातील शेतकऱ्याने जीवन संपवलं



**कडा । प्रतिनिधी**

मान्सूनपूर्व अवकाळीने पावसाने जोरदार हजेरी लावल्याने विक्रीसाठी आलेल्या कांद्याचे मोठ्याप्रमाणावर नुकसान झाले. यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्याने शेतातच गळफास घेऊन जीवन संपविल्याची घटना लिंबोडी येथे रविवारी (दि. १) सायंकाळी घडली. गोविंद रंगनाथ आंधळे (४२) असे आत्महत्या केलेल्या शेतकर्याचे नाव आहे. आष्टी तालुक्यातील लिंबोडी येथील शेतकरी गोविंद रंगनाथ आंधळे वय ४२ वर्ष यांनी आपल्या दोन एकर शेतात कांद्याची लागवड केली होती. मान्सूनपूर्व अवकाळी पावसामूळे हाताशी आलेला कांदा वाहून गेला. एकीकडे नुकसान तर दुसरीकडे आर्थिक संकट ओढवल्याने डोक्यावरचे उसनवारी कर्ज कसे फेडायचे या विवंचनेत आंधळे होते. यातूनच शेतकऱ्यांनी रविवारी सायंकाळच्या दरम्यान शेतातच गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांच्या पश्चात आई, वडिल, पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.

# 'जय श्रीराम उद्योगाचे रामकृष्ण' संदीपन पाटील यांना पाच लाख रु. चा आयोगाचा दणका; शेकडो शेतकऱ्यांची केली फसवणूक!







**बीड । प्रतिनिधी**

जय हनुमान शेतकरी बचत गट, माजलगाव यांनी जय श्रीराम उद्योग यांच्याकडून शेतीसाठी आवश्यक अवजारे खरेदी करण्यासाठी त्यांच्या अकाऊंट ला पैसे जमा केले होते. मात्र, संबंधित व्यक्तीने अवजारे वेळेवर पुरवली नाहीत तसेच मळणी यंत्राची देखभाल (सर्विसिंग) सुद्धा करून दिली नाही. त्यामुळे बचत गटाने ग्राहक तक्रार आयोगाकडे दाद मागितली होती.

या प्रकरणाची सुनावणी बीड जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचात झाली. बचत गटाचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आयोगाने जय श्रीराम माजलगाव यांना बचत गटास नऊ दाती पेरणी यंत्राची शिल्लक रक्कम रु. ७५,०००/-, मळणी यंत्राची (सर्विसिंग) करून ▶▶ उर्वरित पान २ वर

**● कृषी विभागाने या कंपनीचा परवाना रद्द करून हजारो शेतकऱ्यांची या कंपनीने फसवणूक केली आहे. दोन वर्षापासून मी खेटे मारले व मला आज न्याय मिळाला पण मला व माझ्या कुटुंबाला मी पैसे भरून देखील मानसिक त्रास खूप झाला असल्या बोगस कंपन्यांमुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. अशा भंगार फसव्या लोकांना जेलमध्ये टाकायला पाहिजे. शेतकऱ्यांना आधीची पाऊस व हवामान साथ देत नाही व असल्या आव्हालदी शेतकऱ्यांच्या मुळावर उठतात. याला तितकाच कृषी विभाग देखील जबबदार हाथ ओले करून घेत असल्याने जबदार आहे. –शेतकरी सोमनाथ शिवाजी भोर कांबी ता . गेवराई जि. बीड.**

## बिंदूसरा मध्यम प्रकल्पावर जाणे धोकादायक; सावधानता अन सुरक्षिततेचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

बिदूंसरा मध्यम प्रकल्प, मौजे पाली ता.जि. बीड येथे धरण पूर्ण क्षमतेने भरले असून धरणाच्या सांडव्यावरून मोठया प्रमाणात पाणी वाहू लागले आहे. या दृश्याचा अनुभव घेण्यासाठी नागरिक मोठया संख्येने धरण परिसरात गर्दी करत आहेत. मात्र सध्याची परिस्थिती अत्यंत धोकादायक असून, नागरिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने खालील सूचनांचे ▶▶ उर्वरित पान २ वर



# जेवणाची भ्रांत असल्याने मातृत्वही नकोसे !

## जिल्ह्यात हजारो महिलांनी काढली गर्भाशयाची पिशवी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात दरवर्षी १ लाख ७५ हजार मजूर ऊसतोडीच्या कामाला जातात. ७८ हजार महिला मजूर कामगार आहेत. महिलांबाबत एक धक्कादाय माहिती समोर आली आहे. ती म्हणजे ८४३ महिलांनी ऊसतोडीला जाण्यापूर्वी गर्भपिशवी काढली आहे.

यामध्ये ३० ते ३५ वयोगटातील महिलांचा समावेश आहे. एवढंच नव्हे तर १५२३ गर्भवती महिला उसाच्या फडात काम असल्याच म्हटल जात आहे.

दोन दिवसांपूर्वी राज्यस्तरावरून बैठकही घेण्यात आली आहे. त्यामध्ये धक्कादायक बाब समोर आली आहे. जिल्ह्यातील ऊसतोड मजूर हे दिवाळीच्या दरम्यान महाराष्ट्रासह परराज्यात कामासाठी जातात. सहा महिने ऊसतोडणी करून ते डिसेंबर, जानेवारी महिन्यात परत येतात. आरोग्य विभागाकडून ऊसतोडीला जाण्यापूर्वी आणि आल्यावर त्यांची आरोग्य तपासणी केली जाते. त्याप्रमाणे आता याचा अहवाल तयार झाला आहे. यात महिलांना विविध आजार असल्याचे समोर आले आहे.

ऊसतोडीला जाण्यापूर्वी जिल्ह्यातील ८४३ महिलांची गर्भपिशवी काढण्यात आली. त्यातही ३० ते ३५ वयोगटातील ४७७ महिलांची शस्त्रक्रिया झाली आहे. अंगावरून जाणे, मासिक पाळीत रक्तस्राव होणे, जंतुसंसर्ग, पोटात दुखणे अशी लक्षणे या महिलांना असल्याचे सांगण्यात आले.पोटात बाळ आणि पोटासाठी हाती कोयता, असा संघर्ष ऊसतोड महिलांचा सुरु आहे. या सर्व महिलांची नोंद माता व बाल संगोपन पोर्टलवर झाली आहे. लोहाची कमतरता, बी–१२ आणि फॉलिक ॲसिडची कमतरता, थलसेमिया, मासिक पाळी, शस्त्रक्रिया किंवा इतर कारणांमुळे रक्तस्राव झाल्यास रक्तक्षय होतो. असाच त्रास असणाऱ्या ऊसतोड महिलांची संख्या ३४१५ एवढी आहे.

# तरुण पिढीला तंबाखूच्या व्यसनापासून दूर ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी: डॉ. आदिती सारडा

## जागतिक तंबाखू विरोधी सप्ताह' आदित्य डेंटल कॉलेजमध्ये साजरा; विद्यार्थ्यांचा जनजागृती उपक्रमांना प्रतिसाद; रॅली, पोस्टर स्पर्धा, व्याख्यानांसह आरोग्य शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

तरुण पिढीला तंबाखूच्या व्यसनापासून दूर ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. जागतिक तंबाखू विरोधी सप्ताह या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी समाजात सकारात्मक संदेश पोहोचवला आहे. या महाविद्यालयात कम्युनिटी डेंटिस्ट्री विभाग समाजातील दंत आरोग्य सुधारण्यासाठी विविध आरोग्य तपासणी तसेच जनजागृती शिबिरे आयोजित करत आहे. या उपक्रमांतर्गत, तंबाखूविरोधी जनजागृती आणि सल्ला देण्याची सेवा देखील दिली जाते. या सेवांसाठी कॉलेजकडे सुसज्ज मोबाइल डेंटल व्हॅन आणि पोर्टेबल डेंटल चेअर उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त जनजागृती करून तरूण पिढीला तंबाखूच्या व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे असे आवाहन कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. अदिती सुभाषचंद्र सारडा यांनी केले.



आदित्य शिक्षण संस्थेत ३१ मे रोजी जागतिक तंबाखू निषेध दिनानिमित्त आदित्य डेंटल कॉलेज, बीड येथे संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली 'तंबाखू विरोधी सप्ताह' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. आदिती सुभाषचंद्र सारडा बोलत होत्या. महाविद्यालयाच्या वतीने २७ मे ते ५ जून दरम्यान विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या सप्ताहात विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी एकत्र येऊन तंबाखूच्या दुष्परिणामाविषयी जनजागृती करण्यासाठी रॅली, पोस्टर स्पर्धा, व्याख्याने व नाटिका यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. तंबाखू आणि त्याच्या सेवनामुळे होणाऱ्या आरोग्यावरच्या गंभीर परिणामांविषयी जनतेमध्ये जागरुकता निर्माण ▶▶ उर्वरित पान २ वर

### वारोळा (आश्रमशाळा तांडा) येथे मयत ऊसतोड कामगारांच्या कुटुंबांना सांत्वनपर भेट व सानुग्रह अनुदान वाटप

## मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी कुटुंबास दिली भेट

**बीड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील वारोळा (आश्रमशाळा तांडा) येथे नुकत्याच झालेल्या अपघातात मृत्यू झालेल्या ऊसतोड कामगारांच्या कुटुंबियांची मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी सांत्वनपर भेट दिली व शासनामार्फत श्रीमती छबुबाई पिराजी राठोड यांना सानुग्रह अनुदानाच्या धनादेशाचे वितरण केले. या प्रसंगी मंत्री राठोड यांनी कुटुंबियांची भावनिक समजूत घेतली आणि राज्य सरकार त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे सांगितले. सानुग्रह आर्थिक सहाय्य देण्यात आले असून, याशिवाय पुढील मदतीसाठीही शासन स्तरावर पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी सांगितले. यावेळी माजलगाव चे तहसीलदार, ▶▶ उर्वरित पान २ वर

